# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१३/२०२३** **दिनांक २१/०९/२०२३**

**स्थळ- व्हिडीओ कॉन्फरन्स व्दारे** **वेळ- दुपारी ०३.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सी.ए. नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा गुरुवार दि.२१/०९/२०२३ रोजी दुपारी ०३.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/२२२२/२०२३, दि.१८.०९.२०२३ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

तथापि समिती सदस्य तथा मा.जिल्हाधिकारी महोदय यांनी काही अपरिहार्य कारणास्तव सभेसाठी उपस्थित राहू शकणार नाही असे कळविल्याने मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा गुरुवार दि.२१/०९/२०२३ रोजी दुपारी ०३.०० वा. व्हिडीओ कॉन्फरन्स व्दारे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा. श्री. सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**मा. श्री. पी. शिवा शंकर, भा.प्र.से.,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

---

**विषय नं.१** **दि.२३.०८.२०२३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५५७** **दि.२३.०८.२०२३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

विषय नं.२ चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.

१. मोतीचुर लाडू व बर्फी प्रसाद बाहयस्त्रोत कंत्राटी कर्मचा-यांकडून किमान वेतन दराने तयार करुन पॅकींग करुन घेणेकामी चक्रीय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.५५८/१ चक्रीय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

२. सन २०२३-२४ करीता मोतीचुर लाडू व बर्फी प्रसाद तयार करुन पॅकींग करुन देणेकामी नव्याने अंदाजे रक्कम रु.२.२२ कोटी मात्रचे उक्त्या मजुरी खर्चाची ई-निविदा मागविणेस व सदर प्रक्रियेकामी येणा-या खर्चास चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.५५८/२ चक्रीय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही- लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

विषय नं.३ नवीन दर्शनरांग इमारतीत श्रींचे स्थानिक लाईव्ह दर्शन व्यवस्था सुरू करणे कामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारकास कामाचा कार्यादेश देणे व मा.तदर्थ समिती सभेतील निर्णयानुसार येणा-या खर्चाची रक्कम मे. श्रीम भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई यांचेकडून वसूल/वजा करणेबाबत. (रु.२७,५०,०००/-)

निर्णय क्र.५५९ प्रस्ताव मंजुर.

(कार्यवाही-सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)

---

विषय नं.४ साईबाबा भक्तनिवासस्थान व साईधर्मशाळा या विभागांसाठी प्रिंटेड बेडशीट उशीकव्हरसह खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.५६० प्रस्ताव मंजुर.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

विषय नं.५ संस्थानचे मंदिर परिसरातील शांतीनिवास व भक्तनिवास इमारती मधील प्रशासकीय कार्यालये साईनिवास अतिथीगृह येथील तळमजल्याचे जागेत स्थलांतरीत करणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१,८२,७१,८६०/-चे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.५६१ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

विषय नं.६ संस्थानमार्फत साजरा करणेत येणारा श्रींचे पुण्यतिथी उत्सव-२०२३ निमित्त साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणे व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.८,६२,०००/-मात्र इतक्या अपेक्षित खर्चास व याकामी दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.५६२ प्रस्ताव मंजुर.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

विषय नं.७ शिर्डी नगरपरिषद हद्दीतील एकुण ६ रस्त्यांचे भूसंपादन करणेसाठी नगरपरिषदेचे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडून अंदाजे एकुण रु.२३२.६४ कोटी रकमेचे निधी मागणी प्रस्तावाबाबत.

निर्णय क्र.५६३ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

विषय नं.८ संस्थानचे विविध इमारतीवरील टेरेसवर रुफ टॉप सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणीकामी ५ वर्ष कालावधीकरीता Project Management Consultant & Transaction Advisor नियुक्त करणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांमधील एल-१ निविदाधारकाशी वाटाघाटी/ चर्चेअंती निर्णय होऊन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.५६४ संस्थानचे विविध इमारतीवरील टेरेसवर रुफ टॉप सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणीकामी मे.सॅलक्नो एनर्जी प्रा.लि. पलामू, (झारखंड) यांचे प्रतिनिधी श्रीमती प्राची सिंग व श्री. प्रदिप कंकरवाल यांनी सादरीकरण केले.

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.

(कार्यवाही-विद्युत विभाग)

---

**विषय नं.९** **सन २०२२-२३ या वर्षासाठी देण्यात आलेल्या एअर सर्कीट ब्रेकर्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट दि.३०/११/२०२३ अखेर संपुष्टात येत असल्याने सन २०२३-२४ या वर्षासाठी एअर सर्कीट ब्रेकर्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट देणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१६,५०,०००/-मात्रचे खर्चास तसेच सदरकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५६५** **मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.**

**(कार्यवाही- विद्युत विभाग)**

---

**विषय नं.१०** **श्री साईबाबा संस्थान पाणी पुरवठा योजनेसाठी मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.२४५ मध्ये देणगीदारामार्फत उभारलेल्या साठवण तलावाचे मुल्यांकन करणे व त्याचा वापर सुरु करणेसाठी आवश्यक दुरुस्ती करणेबाबत.**

**निर्णय क्र.५६६** **मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.**

**(कार्यवाही-पाणीपुरवठा विभाग)**

---

**विषय नं.११** **मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे निर्णयानुसार तांत्रिक सल्लागार श्री.नितीन कुलकर्णी यांचे उपस्थितीत श्री साईबाबा संस्थानची ध्वनिक्षेपन यंत्रणा अद्यावतीकरण करणेकामी प्रकल्पाचे सादरीकरण करणेस तसेच सादरीकरणाअंती त्यांनी DPR ला अनुसरुन BOQ मध्ये नमुद केलेल्या अंदाजे रक्कम रु.१६,१६,१३,८२८/-मात्रचे (सर्व करांसहीत) खर्चास मान्यता मिळून सदरकामी ई-निविदा पध्दतीने कार्यवाही करणेबाबत निर्णयार्थ प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५६७** **श्री साईबाबा संस्थानची ध्वनिक्षेपन यंत्रणा अद्यावतीकरण करणेकामी प्रकल्पाचे सादरीकरण करणेकामी श्री.नितीन कुलकर्णी हे जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे उपस्थित होते, तर श्री. हरप्रित सिंग हे ऑनलाईन उपस्थित होते, त्यांनी प्रकल्पाबाबतचे सादरीकरण केले. याकामी संस्थानने नियुक्त केलेल्या तांत्रिक समितीचे सदस्य श्री. रविंद्र रेड्डी हे ऑनलाईन उपस्थित होते.**

**सविस्तर अभ्यास करुन व स्थळ पाहणी करुन याबाबत निर्णय घेता येईल.**

**(कार्यवाही-ध्वनिक्षेपन व टेलिफोन विभाग)**

---

विषय नं.१२ नवीन ठेकेदार नियुक्तीची ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो सध्याचे नियुक्त ठेकेदार यांना आहे त्याच अटी-शर्तीवर मंजुर दराने पुनश्च: मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.५६८ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

विषय नं.१३ साई धर्मशाळा, साईआश्रम भक्तनिवासस्थान विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊस किपींग, विद्युत, प्लंबींग, स्वच्छता इत्यादी दुरुस्ती व देखभालीची कामे व व्दारावती भक्तनिवासस्थान विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊस किपींग स्वच्छतेची कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी सात महिने कालावधीकरीता प्रस्तावीत करणेत आलेल्या जाहिरात प्री बीड मिटींगमधील उपस्थीत मुद्दयांच्या अनुशंगाने १८ महिन्याचे कालावधीसाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.५६९ वाढीव कालावधीचे खर्चासाठी अंदाजपत्रकीय तरतुद करण्याचे अटीस अधिन राहून प्रस्ताव मंजूर. वाढीव रकमेचे मंजूरीसाठी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे.
(कार्यवाही-श्री साईआश्रम भक्तनिवासस्थान/विधी विभाग)

---

विषय नं.१४ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडून जिल्हा परिषद, अहमदनगर यांना नवीन वर्ग खोल्या बांधकामासाठी पहिल्या टप्प्यामध्ये देण्यात आलेल्या रु.१० कोटीमधील प्रशासकीय मान्यता आदेशामध्ये अंशत: बदल करणेबाबत.

निर्णय क्र.५७० प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-लेखाशाखा)

---

विषय नं.१५ संस्थान कायम व संस्थान कंत्राटी कर्मचा-यांना गणवेश देणेबाबत. (रु.९१,९०,०००/-)

निर्णय क्र.५७१ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.
(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.१६ विभागीय चौकशी अधिकारी यांचे नेमणुकीबाबत.

निर्णय क्र.५७२ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.
(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.१७** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२३-२४ या वार्षिक खरेदीमधील ई-निविदेत दर प्राप्त न झालेल्या Laboratory Material करीता दर निश्‍चीती (Rate Contract) करणेकामीच्या फेर ई-निविदेस अनुसरुन निम्नत्तम दरधारकास पुरवठा आदेश देणेस तसेच उर्वरीत Laboratory Material करीता फेर ई-निविदा मागविणेबाबत.**

**निर्णय क्र.५७३** **मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.१८** **सौ. सुजाता नंदकुमार जोशी, सेवानिवृत्त परिसेविका, श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साईबाबा हॉस्पीटल यांचा एक वेतन वाढ रोखून धरलेल्या शिक्षेविरूध्द अपील अर्ज.**

**निर्णय क्र.५७४** **मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.१९** **श्री साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल-२०२३ ते जुन-२०२३ अखेर वैद्यकीय उपचार व औषधांसाठी झालेल्या रक्कम रु.२,२२,२२,९७२/-च्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५७५** **नोंद घेतली.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**विषय नं.२०** **श्री साईनाथ रक्तकेंद्राचे रक्त पिशवीचे व रक्त घटकांचे सेवा शुल्क शासन निर्णयाप्रमाणे आकारणेबाबत.**

**निर्णय क्र.५७६** **मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.**

**(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)**

---

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१** श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०२३ साजरा करणेस व त्याकामी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.५७७** प्रस्ताव मंजुर. सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग/विधी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२** नैसर्गिक शेतकरी शिबीरासाठी सशुल्क निवासव्यवस्था, श्री साई आश्रम शताब्दी मंडप व इतर सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.

**निर्णय क्र.५७८** मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३** महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत, पुणे यांची लक्ष्मीवाडी मळा, ता.राहाता, जि.अहमदनगर येथील शेती महामंडळाची जमीन एकुण क्षेत्र ०३ हेक्टर ७८ आर इतके क्षेत्र श्री साईबाबा संस्थानला कायम खरेदी मिळणेकामीचा सुधारीत प्रस्ताव सादर करणेबाबत.

**निर्णय क्र.५७९** प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४** मौजे शिर्डी, ता.राहाता येथील महाराष्ट्र शासन यांची सिटी सर्व्हे नं.९३ पै. क्षेत्र ९३.७ चौ.मिटर इतकी जागा ही श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना साईभक्तांचे सुविधेसाठी चप्पल स्टॅण्ड, लाडू काऊंटर व साईभक्तांना बसणेकामी सदर जागेवर बांधकाम करणेसाठी परवानगी मिळणेबाबत.

**निर्णय क्र.५८०** मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.५ श्री साईबाबा संस्थानच्या मुंबईस्थीत साईनिकेतन या इमारतीतील राहत असलेल्या भाडेकरु यांची भाडेवाढ करणेबाबत.

निर्णय क्र.५८१ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.६ संस्थानचे मंदिर परिसर गेट नं. ४ लगत मोबाईल कॅमेरा क्लोकरूम चालविण्यास परवानगी मिळणेबाबत.

निर्णय क्र.५८२ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.७ श्री साईबाबा नवीन दर्शन कॉम्प्लेक्स मधील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग व गार्डनिंगची कामे आऊटसोर्सपध्दतीने करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत.

निर्णय क्र.५८३ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.

(कार्यवाही-आरोग्य विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.८ श्री साई प्रसादालय येथील जुनी सोलर स्टीम कुकींग यंत्रणा बायबॅक करुन नवीन अत्याधुनिक सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उभारणी करणेस मान्यता मिळणेबाबत. (४.५ कोटी)

निर्णय क्र.५८४ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.९ साईगार्डन प्रकल्पाअंतर्गत उभारणेत येणा-या लेजर शो प्रकल्पाचे ठेकेदार मे. लेजर व्हिजनलि. हॉंगकॉंग यांचे समवेत अर्बिट्रेशन करणेबाबत.

निर्णय क्र.५८५ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१० नवीन श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारतीचे समोर साईभक्तांचे सुविधेकरीता व साईभक्तांचे ऊन, वारा व पाऊस यापासून संरक्षण होणेसाठी कायमस्वरुपी टेंसाईल फॅब्रीकचे छत असलेले शेड उभारणेसाठी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.५८६ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.११ संस्थानचे सर्व निवासस्थानामध्ये खोली देतेवेळी साईभक्तांकडून अनामत (डिपॉझिट) रक्कम घेणेबाबत.

निर्णय क्र.५८७ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.

(कार्यवाही-श्री साईबाबा भक्तनिवासस्थान )

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१२ संस्थानचे दोन्ही रुग्णालयाचे मंजूर उपचार दरातील व तज्ञ डॉक्टरांना कामाच्या प्रमाणात देण्यात येणा-या प्रोत्साहन भत्त्यामध्ये सुधारणा करणेबाबत.

निर्णय क्र.५८८ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.

(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३ श्री साईबाबा हॉस्पीटल ESIC (Employees State Insurance Corporation) अंतर्गत Empanel करणेबाबत चा प्रस्ताव सादर करणेस निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.५८९ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४ श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरामध्ये जनऔषधीचे जेनेरीक औषध दुकान चालू करणेबाबत.**

**निर्णय क्र.५९० मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५ वाढीव संयुक्त पाणी पुरवठा टप्पा क्र.१ चे योजनेकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची नियुक्ती रद्द करणेबाबत तसेच सुधारीत योजना तयार करणेसाठी संकल्पन, अंदाजपत्रक तयार करणे, प्रकल्प व्यवस्थापन या सेवा घेणेसाठी तज्ञ व अनुभवी सल्लागारांकडून ई-निविदा प्रस्ताव मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५९१ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.**

**(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६ दि.२० एप्रिल,२०२२ रोजीचे सुधारीत शासन निर्णयानुसार वाहतुक भत्ता (TA) मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५९२ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचेकडील भुसंपादन निवाडा एलएक्यु/एसआर/१०/२०००, दि.१३.०८.२०१५ अन्वयेच्या निवाडयाप्रमाणे क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौमी) चा ताबा संस्थानला मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५९३** **मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**वरील निर्णय क्र.५५७ ते ५९३ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं. ०५.०० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(पी.शिवा शंकर,भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**